दैनिक

# धाराशिव नामा

Email- dharashivnama1@gmail.com

मुख्य संपादक : विनोद विठ्ठलराव बाकले

धाराशिव (महाराष्ट्र) ▪ दैनिक ▪ मराठी ▪ वर्ष तिसरे ▪ अंक क्र.८० ▪ गुरूवार दि.०७ ऑगस्ट २०२५ ▪ RNI No-MHMAR/2025/A0166 ▪ पाने-४ ▪ किंमत-५ रूपये

# महसुली कामात धाराशिव जिल्हा राज्यात अग्रेसर राहिला पाहिजे-जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार

**धाराशिव नामा/** वृत्तसेवा

धाराशिवः महसूल विभागातील कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजास प्रथम प्राधान्य द्यावे. कर्मचाऱ्यांनी कार्यालयीन कामकाजा सोबतच आपल्या कुटूंबाच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे. महाराष्ट्र राज्यातील महसूल विभागाच्या कार्यात धाराशिव जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला पाहिजे. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी केले. ते भूम येथे सोमवारी (दि.4) आयोजित महसूल दिनाच्या कार्यक्रमात बोलत होते.

भूम येथील रामहरी मंगल कार्यालयात जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्या प्रमुख उपस्थितीत सोमवारी दि. 4 ऑगस्ट रोजी जिल्हास्तरिय महसूल दिन उत्साहात साजरा करण्यात आला होता. यावेळी महसूल विभागामध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या शिपाई पासून उपजिल्हाधिकारी पर्यंत अधिकारी, कर्मचाऱ्यांचा प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

पुढे बोलताना जिल्हाधिकारी पुजार म्हणाले की, महाराष्ट्र राज्यातील महसूल विभागाच्या कार्यात धाराशिव जिल्हा नेहमीच अग्रेसर राहिला पाहिजे. त्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी झोकून देऊन काम करावे. कार्यक्रमास जिल्हाधिकारी यांच्यासोबत त्यांच्या सौभाग्यवती सौम्यश्री पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मैनाक घोष, अपर जिल्हाधिकारी ज्योती पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव, भूमचे प्रभारी पाटील, धाराशिवचे उपविभागीय अधिकारी ओंकार देशमुख, धाराशिवच्या तहसीलदार डॉ.मृणाल जाधव, तहसीलदार जयवंतराव पाटील, तसेच जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, नायव तहसीलदार, मंडळ अधिकारी, महसूल सहायक, ग्राम महसूल अधिकारी, पोलीस पाटील, कोतवाल व महसूल विभागातील सर्व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमात महसूल विभागातील गुणवंत कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली. यामध्ये 5 ग्राम महसूल अधिकारी यांची मंडळ अधिकारीपदी, 7 शिपायांची सहाय्यक पदावर, तर 2 मंडळ अधिकारी यांची नायब तहसीलदार पदावर पदोन्नती करण्यात आली. तसेच वर्षभरात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या 3 अधिकारी, 39 कर्मचारी आणि 6 पाल्यांचा जिल्हाधिकारी यांच्या हस्ते सत्कार व अभिनंदन करण्यात आले.

हरित धाराशिव अभियान व आकांक्षित जिल्हा योजनेत विशेष कामगिरी करणाऱ्यांनाही गौरवण्यात आले. कर्मचारी तणाव दूर करण्यासाठी हास्यरंग फेम दीपक देशपांडे यांचा विनोदी कार्यक्रम आयोजित करण्यात




आला होता. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शोभा जाधव यांनी केले. सूत्रसंचालन मृणाल जाधव यांनी तर आभार तहसीलदार जयवंत पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाचे आयोजन तहसील कार्यालय भूम व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. यावेळी विविध संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यांनी आपली मनोगते व्यक्त केली.

# भैरवनाथ अध्यापक विद्यालयाच्या वार्षिक निकालात प्रिती महाद्वार व स्वप्नाली हुके प्रथम

कळंब येथील भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचे जून 2025 च्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी



**धाराशिव नामा/** वृत्तसेवा

कळंब : धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील यांच्या प्रेरणेने आणि प्राचार्य सतीश मातने यांच्या मार्गदर्शनाखाली वेद शैक्षणिक संकुल अंतर्गत कार्यरत असलेल्या भैरवनाथ अध्यापक विद्यालयाचा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे आयोजित वार्षिक परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे.

प्रथम वर्षामध्ये प्रिती रमेश महाद्वार हिने 84.00% गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला.तर ज्योती ज्ञानेश्वर मोरे-81.70% द्वितीय क्रमांक,साक्षी संतोषराव कवडे 80.60%, तृतीय क्रमांक आकांक्षा अशोक पसारे व सपना सर्जेराव टळे 80.20%, संयुक्त चतुर्थ क्रमांक मिळविला. द्वितीय वर्षात स्वप्नाली हुके हिने 83.00% गुणांसह प्रथम क्रमांक मिळवला.तर नेहा हरिश्चंद्र शिरसट 82.75%, द्वितीय संयुक्ता प्रदीप सुके 81.10%, तृतीय तेजस्विनी बाळासाहेब जगताप 80.95%, चतुर्थ साक्षी काकासाहेब वाघमारे 80.25%, पाचवा क्रमांक मिळवला आहे. प्रथम वर्षातील एकूण 47 विद्यार्थ्यांपैकी 19 विद्यार्थी उत्तीर्ण झाले तर 28 विद्यार्थी एटीकेटीसह उत्तीर्ण झाले.द्वितीय वर्षातील एकूण 44 विद्यार्थ्यांपैकी 21 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून या गुणवंत छात्राध्यापकांचे संस्थेचे अध्यक्ष डॉ.वेदप्रकाश पाटील डॉ.प्रतापसिंह पाटील व आमदार डॉ.राहुल पाटील, डायट प्राचार्य डॉ.दयानंद जटनुरे यांच्यासह प्राचार्य सतिश मातने व शिक्षक वर्गाच्या वतीने अभिनंदन करण्यात येत आहे.

## जिल्हाधिकारी पुजार यांचा लाकाळ यांच्या हस्ते सत्कार



धाराशिव: जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांना उत्कृष्ट प्रशासकीय कामगिरीबद्दल महाराष्ट्र राज्य सरकारकडून ब्राँझ पदक प्रदान करण्यात आले. याबद्दल धाराशिव येथे शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी पुजार यांचा तालुकाप्रमुख अजित लाकाळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी तुळजापूर तालुकाप्रमुख अमोल जाधव, रमेश चिवचिवे, संजय लोंढे, मनोज लाकाळ आदींची उपस्थिती होती.

# राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार-डॉ.प्रतापसिंह पाटील

**धाराशिव नामा/** वृत्तसेवा

धाराशिव : भूम-परांडा-वाशी विधानसभा मतदारसंघात काही नेते व पदाधिकाऱ्यांनी पक्षांतर केले असले तरी मतदारांवर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. या मतदारसंघातील जनता ही स्वाभिमानी असून, गुत्तेदारांची टोळी जरी इतर गटात प्रवेश करत असली, तरी खरे मतदार मात्र अजूनही शरद पवार साहेबांच्या सोबतच आहेत, असे रोखठोक मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस डॉ. प्रतापसिंह पाटील यांनी व्यक्त केले.

आजच माजी आमदार राहुल मोटे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) मध्ये प्रवेश केला. त्या पार्श्वभूमीवर डॉ. पाटील यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे तीव्र प्रतिक्रिया नोंदवली. "35 हजार मतांनी पराभूत झाल्यानंतरही पवार साहेबांनी त्या व्यक्तीस पुन्हा उमेदवारी दिली. इतर कुणालाही तिकीट दिले असते, तर ती जागा निश्चितच पक्षाच्या ताब्यात राहिली असती.



पक्षाच्या उपकारांची जाण न ठेवणाऱ्यांबद्दल मला फारसे बोलायचे नाही," असे त्यांनी म्हटले. "माजी आमदाराची खरी पात्रता आणि मतदारांशी त्यांचा खरा संपर्क येणाऱ्या निवडणुकीत स्पष्ट होईल," असा टोलाही त्यांनी लगावला. पुढे बोलताना ते म्हणाले, "मी भूम, परांडा आणि वाशी या तिन्ही तालुक्यातील प्रत्येक राष्ट्रवादी काँग्रेस कार्यकर्त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहणार आहे. प्रत्येक निवडणूक ताकतीने लढवली जाईल."

डॉ. पाटील यांनी स्पष्ट केले की, "पक्षाच्या जीवावर पाच वेळा उमेदवारी घेऊन शेवटी गद्दारी करणाऱ्याला जनता नक्कीच माफ करणार नाही. अशा व्यक्तीला हद्दपार केल्याशिवाय मतदार शांत बसणार नाहीत."येत्या काळात शरदचंद्र पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे गावोगावी व तालुक्यात कार्यकर्त्यांशी संवाद साधला जाईल आणि मोठ्या मेळाव्याचं आयोजनही लवकरच केलं जाईल, असे त्यांनी जाहीर केले.

# जुलैमध्ये परीक्षा दिलेल्या इंजिनिअरिंगच्या कॅप राऊंडसाठी ग्राह्य धरण्याची सोनवणे यांची मागणी

**धाराशिव नामा/** वृत्तसेवा

धाराशिव : सध्या इयत्ता 12 वी व सीईटी परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सीईटी अंतर्गत कॅप राऊंड सुरू आहेत. यामध्ये दि. 22 जुलैपर्यंत अर्ज दाखल केलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय पसंती क्रमांक देण्यासाठी ग्राह्य व पात्र केलेले आहे. मार्च-एप्रिल 2025 महिन्यात परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना ते अर्ज करता आलेले आहेत. मात्र, जुलै 2025 मध्ये परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचे निकाल दि.29 जुलै रोजी लागलेले आहेत. त्यामुळे त्यांनी निकाल लागल्यानंतर अर्ज दाखल केलेले आहेत. कॅप राऊंड सुरू असून जुलैमध्ये उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पसंती क्रमांकसाठी पात्र धरले जात नाही. त्यामुळे त्या विद्यार्थ्यांवर अन्याय होत आहे. त्यामुळे जुलैमध्ये परीक्षा दिलेल्या व उत्तीर्ण झालेल्या त्या सर्व विद्यार्थ्यांना कॅप राऊंडसाठी पात्र ठरवून त्यांच्यावरील अन्याय दूर करावा, अशी मागणी पालक मल्लिकार्जुन दशरथ सोनवणे यांनी एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांसह उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्यासह संबंधित मंत्र्याकडे दि.6 ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, सध्या इंजिनिअरिंग प्रवेशासाठी सीईटी अंतर्गत कॅप राऊंड प्रक्रिया सुरू आहे. मात्र यासाठी दि. 22 जुलैपर्यंत अर्ज दाखल करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच या कॅप राऊंडमध्ये पसंती क्रमांक करण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. जुलै 2025 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी 12 वी विज्ञानची परीक्षा दिलेली आहे, त्या परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने दि. 29 जुलै रोजी लागलेला आहे. त्याची मार्कशीट देखील अद्यापपर्यंत आलेली नाहीत. यामध्ये माझी कन्या भावना हिचा देखील समावेश आहे. तिने इंजिनिअरिंगसाठी दि.1 ऑगस्ट रोजी अर्ज दाखल केला. तर पडताळणीनंर पुन्हा दि.2 ऑगस्ट रोजी तो अर्ज दाखल केला. त्यानंतर सीईटीचा कॅप राऊंड प्रक्रियेसाठी मेसेज येणे क्रमप्राप्त होते.



मात्र, तो मेसेज आलेला नाही. त्यामुळे दि.6 ऑगस्ट रोजी महाविद्यालयाची पसंती क्रमांक टाकण्यासाठी वेबसाईटवर गेलो असता तो ऑप्शनच येत नाही. त्यामुळे सीईटी हेल्पलाइन क्र. 9175108612 या क्रमांकावर ती संपर्क साधला असता ज्या विद्यार्थ्यांनी दि.22 जुलैपर्यंत अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांच्यासाठी कॅप राऊंड आहे. त्यानंतर ज्या विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केलेले आहेत, त्यांना कॉलेजच्या इन्स्टिट्यूट स्तरावर प्रवेश घ्यावा लागेल असे सांगितले. विशेष म्हणजे शासनाने विद्यार्थ्यांना जुलै मध्ये रीतसर फेर परीक्षा देण्याची सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. त्या अनुषंगाने ज्या विद्यार्थ्यांनी जुलैमध्ये परीक्षा दिली व उत्तीर्ण झाले त्या विद्यार्थ्यांचा निकाल दि.29 जुलै रोजी लागला आहे. त्यामुळे दि.22 जुलै पर्यंत अर्ज भरणे अशक्य होते. कारण त्यासाठी आवश्यक असणारे निकष यामध्ये विद्यार्थी पास किंवा नापास तसेच त्या विद्यार्थ्यास किती गुण प्राप्त झाले आहेत हे माहिती होऊ शकत नव्हते. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी फेर परीक्षा दिली आहे व ज्यांनी दि.33 जुलै नंतर इंजिनियरिंगसाठी अर्ज दाखल केलेले आहेत. त्या विद्यार्थ्यांना नियमित विद्यार्थ्यांसोबत कॅप राऊंडसाठी ग्राह्य धरणे व पात्र ठरविणे अपेक्षित आहे. तसे न झाल्यास सदरील विद्यार्थ्यांकडून फीस भरमसाठ आकारली जाणार आहे. त्यामुळे गरीब विद्यार्थ्यांसाठी हे अन्यायकारक असून दि.22 जुलै नंतर अर्ज दाखल केलेल्या आणि राज्यातील फेरपरीक्षा दिलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना शासनाच्या (सीईटी) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे त्या राऊंडसाठी पात्र ठरविण्यात यावे. तसेच विद्यार्थ्यांवर होणारा अन्याय दूर करावा, अशी आग्रही मागणी सोनवणे यांनी केली आहे.